2014

# Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

## (Bi-Monthly)
## Peer-Reviewed Journal
## Impact factor: 0.948

VOL - III Issues: V

**Chief-Editor:**

**Ubale Amol Baban**

30/11/2014

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No III Issues V
ISSN 2278-5655

# शासनाच्या कृषी व संलग्न सेवा विकास योजनांचे आदिवासी समाजाच्या विकासातील योगदान : आढावा

Ms.Yogita M.Bhilore [1] Prof. Dr. Suresh D. Patil[2]

[1] Research Scholar, Professor [2]

[1]NM University Jalgaon. (M.S) , [2]Nutan Maratha College., NM University Jalgaon. (M.S)

**प्रस्तावना:**

आदिवासी समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व डोंगराळ भागात वास्तव्य करणारा आहे. एकूण लोकसंख्येत आदिवासींचे प्रमाण विचारात घेता जगात भारताचा चौथा क्रमांक लागतो. भारतात एकूण ४२७ आदिम जमाती आहेत. या आदिवासी जमातींचे भारतात सर्व राज्यात कमी अधिक प्रमाणात वास्तव्य आहे. भारतातील १८० बोलीभाषापैकी ११६ भाषा आदिवासी समाजात बोलल्या जातात[१]. 'आदिवासी म्हणजे निश्चित कोण? आदिवासी कोणाला म्हणायचे, असे प्रश्न सर्वसामान्य मनुष्याला पडणे साहजिकच आहे. प्रगतनगर संस्कृतीपासून खूप दूर आणि आलिप्त राहीलेले प्रादेशिक मूळचे रहीवासी म्हणजे आदिवासी. सर्वसाधारण पणे दऱ्याखोऱ्यात, डोंगराळ भागातील अरण्यात जे तुरळक वस्ती करुन राहतात त्यांना वनजाती, जनजाती, वनवासी किंवा गिरीजन असे संबोधतात. आविसींच्या चालीरिती त्यांची संस्कृती वैशिष्टयपूर्ण असते. आदिवासींबद्दल सुशिक्षित समाजात एक प्रकारची कुतूहलयुक्त भीती असते. ऐकिव आणि काल्पनिक कथांमुळे आदिवासीबद्दल अनेक गैरसमज आहेत. स्वच्छंदी, वाटेल ते भक्षण करणारे, क्रुर, जादुटोण्यावर विश्वास ठेवणारे उघडे नागडे वावरणारे लोक म्हणजे आदिवासी असा सर्वसाधारणपणे समज आहे. आदी म्हणजे आद्य, अगोदरचा, मूळचा व अति दुर्गम भागात राहणारे इतर समाजाच्या संपर्कात फारसे न येणारे म्हणजे आदिवासी होय. साधारणतः आदिवासी शहरी वस्तीपासून लांबवर असणाऱ्या रानावनात, दऱ्याखोऱ्यांमध्ये, पर्वती आणि डोंगराळ अशा दुर्गम प्रदेशामध्ये राहतात. गिरीजन,वनवासी, जनजाती या नावाने आदिवासी ओळखला जातो.

'आदिवासी किंवा आदिम समाज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाला विविध विचारावंतानी वेगवेगळी नावे दिलेली आहेत. ग्रिगसन, टॅलेंट सेडविक, मार्टिन, ए, व्ही,ठक्कर यांनी या लोकांना अगदी प्राचीन किंवा मुळचे रहीवासी म्हटले आहे. 'आदिम अगर आदिवासी' असे नामाविधान भारतीय घटनेने केले आहे. डॉ.घुर्ये यांनी त्यांना 'तथाकथित मुळचे रहीवासी' व मागासलेले हिंदू असे म्हटले आहे. परंतु भारतीय राज्यघटनेतील कलम ३४२(१) नुसार 'अनुसूचित जमात'असा आदिवासींचा

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No III Issues V
ISSN 2278-5655

उल्लेख केलेला आहे. [२] 'आदिवासी समाज संपूर्ण जगात आढळून येतो.मात्र भारतातील आदिवासी समाज हा सर्वाधिक दुर्बल घटक म्हणून ओळखला जातो'[३]

**१.२ आदिवासी संकल्पनाः**

आदिवासी या संकल्पनेचा अर्थ किंवा व्याख्या वेगवेगळया तज्ज्ञांनी पुढीलप्रमाणे सांगितलेल्या आहे.

i. **रिव्हर्सः** ज्या समूहातील सदस्य एका समान बोली भाषेचा वापर करतात. तसेच युध्दासारख्या समान उद्दिष्ट पूर्तीकरिता एकत्र येऊन झटतात अशा सरळ साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज किंवा जमात असे म्हणतात.

ii. **गिलीन व गिलीनः** आदिवासी समाज म्हणजे एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा समान बोली भाषा बोलणारा व समान सांस्कृतीक जीवन जगणारा पण निरक्षर असा स्थानिक गटाचा समूह होय.

**१.३ आदिवासी समाजाची वैशिष्टयेः**

'आदिवासींच्या अनेकविध जमाती आहेत. त्या प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतीक वैशिष्टये, चालीरिती, धार्मिकता यामध्ये सारखेपणा किंवा एकविविधता आढळत नाही. प्रत्येक जमातीमध्ये वेगवेगळी वैशिष्टये आढळतात. [५]

**१. आदिवासींचे अल्प प्रमाणः**आदिवासी समाजाची इतर समाजाशी तुलना करता त्याचे प्रमाण कमी असल्याचे आढळून येते. विशिष्ट भागात राहणाऱ्या आदिवासींची संख्या शे- पाचशेच्या घरातच असते. मात्र गोंड, संथाल, भिल्ल यासारख्या काही जमातींची संख्या अधिक आहे. ज्या विशिष्ट भूप्रदेशावर आदिवासी राहत असतात तो भूप्रदेश मर्यादित असतो. आदिवासी संख्या कमी असल्याने जनसंपर्कही अल्प असतो.

२.**सामाजिक एकजिनसीपणा :** आदिवासी समाजाचे एकजिनसीपणा हे प्रमुख वैशिष्टय आहे. प्रत्येक जमातीमध्ये समान बोलीभाषा, समान धर्म, समान नियम, समान संस्कृती, समान चालीरीती, समान आर्थिक परिस्थिती यामुळे त्यांच्यात एकजिनसीपणा आढळतो. दैनंदिन जीवनातील कोणतीही घटना केवळ एवढया भागापुरती मर्यादित न राहता सर्व समूहाची बनते. सर्व समाज एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होतो. चालीरीती, परंपरा, धर्मश्रध्दा यांचा आदिवासींवर अत्यंत प्रभाव असतो. त्यांचे ते काटेकोरपणे पालन करतात.

३ **प्रबळ एकात्मताः** आदिवासी समाज हा एकाच रक्त संबंधावर आधारित असतो. आपली उत्पत्ती एकाच पूर्वजापासून झाली यावर त्यांचा दृढ विश्वास असतो. हा पूर्वज कोण होता, केव्हा निर्माण झाला याबद्दल त्यांना ज्ञान असो व नसो आपला पूर्वज एकच आहे.ही भावना त्यांच्यात प्रबळ असते. त्यामुळेच त्यांच्यात विलक्षण बांधिलकी, प्रेम, आपुलकी व सहकार्य निर्माण झालेले असते. ही एकात्मता कोणत्याही जमातीस इतर परकिय जमातीपासून आपले वेगळेपण टिकविण्यास उपयोगी पडते.

४. **स्वतंत्र्य बोली भाषाः** प्रत्येक आदिवासी जमातीचे वेगळेपण दाखविणारे आणि त्याच बरोबर प्रत्येकीचा एकजिनसीपणा स्पष्ट करणारे वैशिष्टय म्हणजे त्या जमातीची स्वतंत्र्य बोलीभाषा होय. भारतात विविध भागामध्ये वेगवेगळया जमाती कमी अधिक प्रमाणात असून त्यांच्या वेगवेगळया बोली भाषा आहेत. त्यावरुन त्यांचे वेगळेपण सहज लक्षात येते. अनेक जमातीवरुन त्यांची बोलीभाषा ओळखली जाते. उदा. कोकणा समाजाची कोकणी बोलीभाषा.

५. **आदिवासींचे अठरा विश्व दारिद्रयः**‘अनादी काळापासून या भूमीवर आदिवासी समाज राहत असल्यामुळे इतर जगाशी त्यांचा संबंध नव्हता. हिंदुस्थानात इंग्रजांची राजवट सुरु झाल्यानंतर त्यांनी धर्म प्रसाराला व आदिवासी समाजाची सेवा करण्यासाठी सुरवात केली. परंतु हा समाज विकासापासून दूर राहीला त्यांची जीवनपध्दती इतर समाजापासून वेगळीच होती. रुढी परंपरा व धर्मश्रध्दा यामध्येच त्यांचे जीवन नियंत्रित झालेले असते. हा समाज अज्ञानी असल्यामुळे व्यापारी व सावकार ह्या वर्गाकडून सुरवातीपासून त्यांची फसवणूक होत होती.[६] आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे दिसून येते. किमान गरजा भागविण्यापुरतेही उत्पन्न त्यांना मिळत नाही. म्हणूनच पूर्वीपासून आपल्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी तो निसर्गावर अवलंबून आहे. कंदमुळे, फळे खाऊन भूक भागविणे, झाडांचा पाला लावून लज्जारक्षण करणे व डोंगरदऱ्यांचा आधार घेऊन निवारा मिळविणे, अशा स्थितीत आदिवासी आपले जीवन जगतात. पुरेशे उत्पन्न नसल्याकारणाने त्यांच्या गरजाही पूर्ण होऊ शकत नाही त्यामुळे पिढयान्‌पिढया ही जमात दारिद्रयात जीवन कंठत आहे. ‘देशाच्या आर्थिक विकासाकरिता राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आवश्यक असली तरी पुरेशी मात्र निश्चितच नाही. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आवश्यक असली तरी पुरेशी मात्र निश्चितच नाही. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढत्या प्रमाणात आदिवासींच्या जीवनाला अर्थ प्राप्त होणार नाही. देशविकासाबरोबरच सामान्य माणसाचे राहणीमान, आरोग्य, शैक्षणिक विकास यासह सामाजिक व आर्थिक सेवा सुविधा आदिवासी समाजाला मिळाल्या पाहिजेत. सामूहिक निर्णय प्रक्रियेत आदिवासींचा सहभाग असणे असे झाले तरच खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येईल’ [७]

६ **आदिवासींवर रुढी परंपरांचा पगडाः** महाराष्ट्रातील आदिवासी बांधवांची एक निराळी फार जुनी असी संस्कृती आहे. शिक्षण व आधुनिक दळणवळणाच्या साधनांमुळे आदिवासी जमाती जसजशा बाहेरच्या जगाच्या संपर्कात येतात. तसतसे ते इतर संस्कृतीपासून आपली स्वतःची संस्कृती स्वतंत्रपणे अबांधित ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. परंतु विज्ञानयुगाच्या या कालखंडात त्यांची संस्कृती स्वतंत्र्यपणे टिकून राहील की नाही हे मात्र सांगता येत नाही. [८] आदिवासी समाज हा परंपराप्रिय समाज आहे. नवीन बद्दल स्वीकारण्यास हा समाज सहजासहजी तयार होत नाही. पूर्वापार चालत आलेल्या चालीरीतीनूसार त्यांचे मार्गक्रमण चालू असते.

**७. धर्मश्रध्दाः** आदिवासी समाजात धर्म व धर्म आचारण यांना अनन्यसाधारण महत्व आहे. निसर्गाच्या सानिध्यात असल्यामुळे निसर्ग शक्तींवरील श्रध्दा व त्या शक्तींना संतुष्ट करुन घेण्यासाठी विशिष्ट प्रार्थना व पूजा केल्या जातात. निसर्गाविषयी आदर असतो. मंत्रतंत्र, जादूटोणा यांच्या साहाय्याने आपल्या इच्छा पूर्ण होऊ शकतात. असी त्यांची धारणा असते. आदिवासीच्या धर्मा मध्ये काही गोष्टी सामान्य असल्यातरी प्रत्येक जमातीच्या धार्मिक कल्पनांची काही वेगळी वैशिष्टये असातात. आदिवासी समाजाच्या या धर्मश्रध्देने त्यांच्या जीवनविषयक दृष्टीकोनात निश्चित बदल झालेला असतो. आदिवासींच्या या प्रमुख वैशिष्टयाखेरीज व्यसनधिनता लाजरी बुजरी मनोवृत्ती, स्वभाविक सचोटी, साक्षरतेचा मोठा अभाव, दैववाद ही प्रमुख वैशिष्टये दिसून येतात. या सर्व बाबींचा विचार करुन त्यांचा जीवनस्तर उंम्चविण्यासाठी व खालच्या स्तरापर्यत विविध मदत पोहचविण्यासाठी शासन प्रयत्न करीत असते.

**१.४.२ आदिवासींच्या कलाः** आादिवासींची धर्म व जादू यांच्याशी कला निगडीत आहे. उपयुक्त वस्तूंचा कलात्मक रुप देण्याची प्रवृत्ती आदिवासींत आढळते. पाषाणांची व शिंपल्यांची आभूषणे आदिवासी लोकांमध्ये अस्मयुगातही होती. नंतरच्या काळात अस्थी व कच्च्या धातूचा वापर आभूषणांकरिता करण्यात येवू लागला. मातीची, तसेच लाकडी भांडे, मुखवटे गणचिन्हे यातून आदिवासींच्या कलेचे दर्शन घडते.

**१.४.३. आदिवासी संगित साहीत्यः** आदिवासी जमातीत गीत गायनाचे प्रसंग वारंवार येतात. अंगाई, प्रीती गीते, युध्दगीते, भजने, हे गीतांचे प्रकार आदिवासींत आढळतात. गीतांचा व साहीत्यांचा अर्थातच संस्कृतीशी निकटचा संबंध असतो. आदिवासींचे विविध वाद्य त्यांच्या आसपास मिळणाऱ्या वस्तूंनी बनविलेली असतात. निरनिराळया प्रकारांचे ढोल, बासरी, टाळ—टिपऱ्या, एकतारी वाद्य त्यांच्यात आढळतात.

**१.५ भारतातील आदिवासी समाजाची भौगोलिक विभागणीः**

आदिवासी समाज हा संपूर्ण भारतात विखुरलेला आहे. २००१ च्या जणगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १०२.७ कोटी होती. त्यात आदिवासी लोकसंख्या ही ८.४३ कोटी इतकी होती. ती एकूण लोकसंख्येच्या ८.२ टक्के इतकी आहे. या आदिवासी जमातीचे भारताच्या सर्व राज्यात कमी अधिक प्रमाणात वास्तव्य पाहायला मिळते. आदिवासी जमाती भारताच्या पुढील सहा विभागामध्ये मुख्यतः आढळतात[१२].

i. **ईशान्य भारतः** अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालॅड आणि त्रिपुरा या राज्यामध्ये व केंद्रशासित प्रदेशामध्ये अबोर, गारो, खासी, कूकी, मिश्मी, नाग इत्यादी आदिवासी जमाती ईशान्य भारतात राहतात.

ii. **हिमालय पायथ्याचा भागः** पंश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि हिमाचल प्रदेशाच्या उत्तर भागामध्ये लेपहा, राभा अशा जमाती राहतात.

iii. **मध्य भारतः** गंगा यमुनेचे खोरे आणि दक्षिण भारत यांना विभागणाऱ्या विंध्य पर्वतरांगा व वनांमध्ये अनेक आदिवासी जमाती राहतात. यात बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, पंश्चिम बंगाल ही राज्ये येतात. या राज्यात भूमिज, गोंड, हो, ओरॅऑन, मुडा, संथाळ या जमाती आढळतात.

iv. **पश्चिम भारतः** राज्यस्थान, महाराष्ट्र , गुजरात, गोवा, दादर व नगरहवेली ही राज्ये येतात. या प्रदेशात राहणाऱ्या आदिवासी जमातीमध्ये भिल्ल ही सर्वात महत्वाची जमात आहे. तसेच वारली, दुबळा, कोकरु या आदिवासी जमातीही राहतात.

v. **दक्षिण भारतः** कर्नाटक, तामिळनाडू , आंध्रप्रदेश आणि केरळ या राज्यामध्ये निलगिरी टेकडया आणि पश्चिम व पूर्व घाटाच्या पर्वतरांगा येथे मिळतात. या डोंगराळ व वनप्रदेशात चेचु , इरुला, कादार, कुरुंबा, टोडा या आदिवासी जमाती राहतात.

vi. **अंदमान—निकोबार प्रदेशः** अंदमान, निकोबार व लक्षद्विप या बेटांवर ओंगे, अंदमानी व काही आदिवासी जमाती राहतात. भारतातील आदिवासींची राज्यनिहाय लोकसंख्या लक्षात घेतली तर ती कमी अधिक प्रमाणात दिसून येते. आदिवासींचे एकूण

vii.

viii.

लोकसंख्येत ५० टक्केहून अधिक प्रमाण असलेल्या राज्यांमध्ये मिझोरम ९५ टक्के, लक्षद्विप ९३ टक्के, दादर नगरहवेली ७९ टक्के, अरुणाचल प्रदेश ६४ टक्के तसेच मेघालय, नागालॅड यांचा देखील समावेश होतो. तर १० टक्क्यापेक्षा जास्त आदिवासींचे प्रमाण असलेल्या राज्यांमध्ये मध्यप्रदेश २३ टक्के, ओरिसा २२ टक्के, गुजरात १० टक्के तसेच आसाम, मणिपूर, राज्यस्थान, सिक्किम, त्रिपुरा, अंदमान, निकोबार व दिवदमण इत्यादी राज्यांचा देखील समावेश होतो. महाराष्ट्र, बिहार, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ या राज्यामध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण १० टक्क्याहून कमी असेल तरी या राज्यातील काही भाग व काही जिल्ह्यातील आदिवासी लोक बहूसंख्य आहेत.

**१.६ भारतातील आदिवासी जमातीचे राज्यनिहाय वर्गीकरण :**

" आदिवासी जमात ही जगाच्या सर्वच भागात आढळते. विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळया नावाने संबोधले जाते. उदा. अमेरिकेत त्यांना रेड इंडियन्स म्हणतात. ऑस्ट्रेलियात ॲबोरिजिन्स, युरोपीय जिप्सी, तर आफ्रिका आणि आशियाई देशांमध्ये आदिवासी या नावाने ओळखले जाते. आफ्रिका खंडानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारतामध्ये सर्वसाधारण त्यांना आदिवासी म्हणजे मूळ निवासी म्हटले जाते. तथापि एकूण लोकसंख्येच्या ८.२ टक्के लोकसंख्या असलेल्या या समूहास भारतीय राज्यघटनेनुसार 'अनुसूचित जमाती' असे वर्गीकृत करण्यात आले आहे"[१३]

**सारणी क्र १.१ : भारतातील आदिवासी जमातींचे राज्यनिहाय वर्गीकरण**

| अ.नं | राज्य | अदिवासी जमाती |
|---|---|---|
| १ | उत्तर प्रदेश | ओकसा |
| २ | कर्नाटक | नायक |
| ३ | पंजाब व हिमाचल प्रदेश | गद्दी, स्वंग, भोट, भोटीया, खाम्पा, गवदी, लहोल, पगवल, लांब |
| ४ | जम्मु काश्मीर | बकरवाल,बाल्टी |
| ५ | गुजरात | धोडीया, दुबळा, भिल्ल |
| ६ | अरुणाचल प्रदेश | आवी, मिश्मी, अपातमी, मोग्या,वांचू |
| ७ | राज्यस्थान | भिल्ल, गरासिया, मीना, दुबळा, गोंड, कोरकू, कोळी |
| ८ | बिहार | असुर, मुंडा, उरॉव, संथाल, बैगा, बंजारे, बिरहोर, गोंड, हो |
| ९ | मध्यप्रदेश | अगडीया, भिल्ल, कोरल, वैगा, गदबा, गोंड, कोल, कोलम, उरॉव, परधा |
| १० | आसाम | गोरो, खासी , कुकी, मिझो, मिकिरनाग, अबोर, उपला, मिश्म, अप्तानी, सिंगफो (काचरी) |
| ११ | महाराष्ट्र | अंध, भिल्ल, पारधी, वारली, कोकणी, कोळी, ठाकूर, दुबळा, धोंडी, बैगा, गुदवा, कमार, खाडीया, गोंड, कोल, कोलाम, कोकरु, कोरवा, मुंडा, उरॉव, कातकरी, वाधरी, महादेव कोळी. |

| | | |
|---|---|---|
| १२ | पंश्चिम बंगाल | हो, कोल, मुंडा, उरॉव, भूमिज, संथाळ, गारो, लेपचा, असुर, बैगा, बंजारे, गोंड, बिरहोर, |
| १३ | आंध्रप्रदेश | यनाडी, चेंचू, कोया, गदब, अतपूत, कोंडा, दोडा–कोडा, खापुस, रेडरुडी, खोड, सुगली (लंबागी), येस्कुल, भिल्ल, गोंड, डोंगरी, कोलाम, वाल्मिक, परधान |
| १४ | तामिळनाडू | तोड, मलयानी,कद, इरुल, कोत, अरियन, अरदान, कोरग, कुरिचियम, मालसर, कुरुमन, |
| १५ | केरळ | अडियन, कदर, इरुल, मुथुवन, मलंकुरवन, मलयरन, भलवेतन, पलयन,मन्नन, उरळी |
| १६ | ओरिसा | बंजारा, वैगा, बिरहोर, बोंदो, चेंचू, गदबा, गोंड, हो, जतपुस, जुआँग, खडीया, कोल, खोंड, |
| १७ | म्हैसूर | गोदलू, इरुलिंग, मलैकुडी, भिल्ल, गोंड, वारली, चेचू, कोया, अनरदन, येरव, होलेग, कोलम |
| १८ | सिक्किम व मेघालय | भुतिया, मिझो |
| १९ | त्रिपुरा | चंक्मा, लुशाई, मग, खासी, भुतिया, मुंडा, संथाळ, भिल्ल,जमालिय, उटळे. |
| २० | मिझोरम, मणिपूर | मिझो, अयमोल, अंगामी,मिझो, पैले, पुरवमा,सेमा |
| २१ | नागालॅंड व लक्षद्विप | नागर, ठाकूर |
| २२ | अंन्दमान व निकोबार | शॉ पेन, जवास, सेन्टी, निलिल, ग्रॅट अंडनामी |
| २३ | दिव, दमण, दादरा, | धोडी, धाडीया |

भारतीय जनगना अहवाल २०११

वरील सारणी क्र . १.१ वरुन असे स्पष्ट होते की, भारतातील सर्व आदिवासी जमाती असून त्या वेगवेगळया नावाने ओळखल्या जातात. महाराष्ट्र , ओरिसा, बिहार, आसाम, मध्यप्रदेश हया राज्यांमध्ये सर्वाधिक वास्तव्य दिसून येते तर इतर राज्यात व केंद्रशासित राज्यात अगदी नगण्य प्रमाणात आदिवासी जमाती आढळतात.

**१.७ आदिवासींचे भाषिक वर्गीकरण :**

भारतातील लोकांची विविधता अनेक गोष्टींप्रमाणे भिन्न भिन्न भाषांमधून दिसून येते. आदिवासी लोकही वेगवेगळया भाषा बोलणारे आहेत.भारतीय भाषांचा सखोल अभ्यासावरुन भारतात आदिवासींच्या चार प्रमुख कुटुंब पध्दती आढळतात. काही आदिवासी जमाती प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे आपली मूळ भाषा विसरलेले आहेत. मात्र बहुसंख्य आदिवासींनी आपल्या बोलीभाषा अद्यापही टिकवून ठेवल्या आहेत. 'ग्रिअर्सन' यांच्या संशोधनानुसार भारतात एकूण १८० भाषा व ११६ बोली भाषा आदिवासींच्या आहेत. भाषेच्या आधारावर भारतातील आदिचासींचे विभाजन खालीलप्रमाणे चार विभागात करता येईल.

i.

ii.

iii.

iv. **आर्य भाषिक समूहः** आर्य लोकांचे भारतात आगमन झाल्यानंतर त्यांच्या भाषेचा प्रभाव भारताच्या बऱ्याच मोठया प्रदेशावर पडला. त्यांच्या मूळ भाषेवरुन आजचा हिंदी, पंजाबी, बंगाली , गुजराती , मराठी, उडिसा, आसामी, इत्यादी भाषा विकसित झाल्या आहेत. वास्तविक कोणत्याही आदिवासीच्या या मूळ भाषा नाहीत. पण या भाषा बोलणाऱ्या इतर लोकांच्या संपर्कात आल्यामुळे आदिवासींनी या भाषा आत्मसात केल्या आहेत. महाराष्ट्रातील वारली, कातकरी, ठाकूर तसेच मध्य भारतातील भिल्ल यांच्या भाषा सदरात येतात.

v. **द्रविड भाषिक** :वायव्य व दक्षिण मध्य भारतात द्रविड भाषा बोलली जाते. कोरवा, थरावा, बडग, तोडा, कोटा, गई, गोंड इत्यादी भाषा मूळ द्रविडी भाषेपासून जन्मल्या आहेत. या भाषा बोलणारे सुमारे २० लाख आदिवासी आहेत. यापैकी गोंड जमातीची गोंडी व उरॉव जमातीची कुरवी या दोन भाषा विशेष महत्वाच्या आहेत. कुरवी या भाषेचे प्राचीन तामिळ भाषेशी बरेच साम्य आहे.

vi. **ऑस्टो एशियायिक** : भारताच्या मध्यवर्ती विभागात राहणाऱ्या आदिवासींच्या या गटात समावेश केला जातो. कोळ, मुंडा, खासी, निकोबरी, कोरकू, खरिया, सवरा, गडवा या जमातींच्या बोली या गटात मोडतात. ऑस्ट्रिक भाषेच्या परिवारातील मुंडा ही भाषा भारतात बोलली जाते. संथाली आणि मुंडा या दोन भाषा बऱ्याच विकसित असून यामध्ये भरपूर लोकांचे वाङःमय पाहायला मिळाते. कलकत्ता विद्यापिठात या भाषांच्या अध्यापनाची सोय आहे.

vii. **तिबेट– चिनी भाषा** :भारताच्या उत्तर व ईशान्य भागात राहात असणाऱ्या आदिवासींचा या गटात समावेश होतो. नागा, कुकी, खासी, डफळा, मिरामी, मिकीर हे लोक चिनी–तिबेट भाषिक समजले जातात. तिबेटी व बर्मी भाषिक आणि सयामी व चिनी भाषिक असे त्यांचे दोन उपप्रकार पाहायला मिळतात. भाषांच्या आधारे केलेले भारतीय आदिवासी जमातीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे पाहता येते.

**१.८ आदिवासींचे वांशिक वर्गीकरण :**

संपूर्ण मानव जमात जीवशास्त्रीय दृष्टीने जरी मानव या एकाच प्रकारात मोडणारी असली व सर्व मानवाची मूलभूत रचना समान

असली तरी जगभरातल्या मनुष्य प्राण्यामध्ये मूलभूत शारिरीक भेद दिसून येतात. विशिष्ट शारीरिक लक्षणे असणाऱ्या या मानव समुहाला एक विशिष्टय वंश मानून जगातील मानवांचे वांशिक वर्गीकरण करण्याचा प्रयत्न शारिरीक मानववंशशास्त्रज्ञ करतात. मानवाची उंची, त्वचेचा रंग, डोळयांचा आकार व रंग, कपाळ, नाक, ओठ, केस, जबडा, हनुवटी इत्यादी लक्षणाच्या आधारे वंश ठरविले जातात. भारतातील संशोधकांनी भारतीयांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्यात एकमत असल्याचे दिसून येत नाही

**महाराष्ट्रातील आदिवासी समाज :**

महाराष्ट्रातील राज्यातील आदिवासी विकास विभागाकडे, अनुसूचित जमातीच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. २००१ च्या जणगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या ९६८.७९ कोटी इतकी होती. टयात

आदिवासी लोकसंख्या ८५.७ लाख इतकी होती. ती महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.८५ टक्के इतकी आहे. राज्यातील ४२.५ टक्के आदिवासी लोकसंख्या ही राज्यातील १५ जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विखुरलेली आहे. याशिवाय आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासी लोकसंख्या ४९ टक्क्यांहून जास्त असलेल्या खेडयांचा समूह ज्याला माडा मिनीमाडा असे म्हणतात तेथे वास्तव्य करुन आहे. उर्वरित ५१ टक्के आदिवासी लोकसंख्या ही आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आहे. आदिवासी लोक आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेले आहेत. महाराष्ट्रातील ८५ टक्के आदिवासी लोक हे शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. ४० टक्के आदिवासी शेतकरी असून ४५ टक्के आदिवासी शेतमजूर आहेत. म्हणून आजही आदिवांसीची अर्थव्यवस्था ही कृषी व संलग्न व्यवसायावर अवलंबून आहे. बहुसंख्य आदिवासी कुटुंबे ही त्यांच्या उत्पन्नाचे व व्यवसायाचे मुख्य साधन म्हणून शेती व्यवसायावर अवलंबून असली तरी अपुरे तंत्रज्ञान व उत्पादनाची अपुरे साधने ही आदिवासीच्या शेतीची ठळक वैशिष्टये लक्षात घेता आदिवासी क्षेत्रात सिंचन सुविधा नगण्य आहेत. शेती व्यवसायाच्या व्यतिरिक्त आदिवासी लोक चटया, टोपल्या तयार करणे, जंगलातील वनऔषधी गोळा करणे, गवत कापणे, शिकार करणे इत्यादी उदयोग व्यवसाय करतात. आदिवासींचे राहणीमान साधे व गरजा अत्यंत मर्यादित आहेत[१६].

**सारणी क्र. १.२ महाराष्ट्रतील आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण**

| अ.नं. | जनगणना | राज्याची लोकसंख्या (कोटी) | आदिवासी लोकसंख्या(लाख) | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९८१ | ६.२७ | ५७.७२ | ९.१९ |
| २ | १९९१ | ७.२९ | ७३.१८ | ९.२७ |
| ३ | २००१ | ९.६८ | ८५.७७ | ८.८५ |
| ४ | २०११ | ११.२३ | – | – |

आजच्या स्थितीत आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती सुधारावी, त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावा, जीवन जगण्याची साधने त्यांना आदिवासी भागातच उपलब्ध व्हावीत म्हणून महाराष्ट्र शासन तसेच विविध स्वयंसेवी संस्था, महामंडळे आपापल्या परीने प्रयत्न करीत आहे तरी सुध्दा आदिवासी समाज विकासाच्या प्रवाहापासून दूर आहे. महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.की.मी. एवढे असून त्यापैकी ५७,७५७ चौ.की.मी. क्षेत्र हे उपाययोजनाखाली येते. राज्याच्या एकूण क्षेत्राशी हे प्रमाण १६.५ टक्के एवढे आहे. गेल्या चार दशकातील राज्यांची एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलना केल्यास प्रमाण लक्षात येते.

**सारणी क्र. १.३ महाराष्ट्रातील आदिवासींचे जिल्हानिहाय वर्गीकरण**

| अ.नं. | जिल्हा | लोकसंख्या (लाखात) | |
|---|---|---|---|
| | | एकूण | आदिवासी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | ८६.०४ | ०.७० |
| २ | ठाणे | ८१.३१ | ११.९९ |
| ३ | रायगड | २२.०७ | २.६९ |
| ४ | मुंबई | ३३.३८ | ०.२० |
| ५ | रत्नागिरी | १६.९६ | ०.२० |
| ६ | सिंधूदूर्ग | ८.६८ | ०.०४ |
| ७ | नाशिक | ४९.९३ | ११.९४ |
| ८ | धुळे | १७.०७ | ४.४ |
| ९ | जळगाव | ३६.८२ | ४.३५ |
| १० | अहमदनगर | ४०.४० | ३.०३ |
| ११ | पुणे | ७२.३२ | २.६८ |
| १२ | सातारा | २८.०८ | ०.२१ |
| १३ | सांगली | २५.८३ | ०.१७ |
| १४ | सोलापूर | ३८.४९ | ०.६८ |
| १५ | कोल्हापूर | ३५.२३ | ०.२१ |
| १६ | औरंगाबाद | २८.९७ | १.०० |
| १७ | झालना | १६.१२ | ०.३२ |
| १८ | परभणी | १५.२७ | ०.३५ |
| १९ | बीड | २१.६१ | ०.२४ |
| २० | नांदेड | २८.७६ | २.५३ |
| २१ | उस्मानाबाद | १४.८६ | ०.२७ |
| २२ | लातूर | २०.८० | ०.४७ |
| २३ | अमरावती | २६.०७ | ३.५६ |
| २४ | यवतमाळ | २४.५८ | १.१५ |
| २५ | बुलढाणा | २२.३२ | १.०० |
| २६ | अकोला | १६.३० | १.५४ |
| २७ | वर्धा | १२.३६ | ४.४४ |
| २८ | नागपूर | ४०.६७ | ४.४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | भंडारा | ११.३६ | ०.९७ |
| ३० | चंद्रपूर | २०.७१ | ३.७५ |
| ३१ | गडचिरोली | ९.७० | ३.७१ |
| ३२ | नंदूरबार | १३.११ | ८.५ |
| ३३ | वासिम | १०.२० | ०.७० |
| ३४ | गोंदिया | १२.०० | १.९६ |
| ३५ | हिंगोली | ९.८७ | ०.८६ |
| महाराष्ट्र | | ९६८.७ | ८५.७० |

भारतीय जनगणना अहवाल (२००१)

वरील सारणी क्र. १.३ वरुन असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच जिल्ह्यात आदिवासींचे प्रमाण कमी अधिक असल्यांचे दिसून येते. नाशिक, धुळे, नंदूरबार, गडचिरोली, यवतमाळ व चंद्रपूर या जिल्ह्यामध्ये आदिवासींचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. आदिवासी समाज शैक्षणिक दृष्टया मागासलेला दिसून येतो. महाराष्ट्र राज्यातील एकूण साक्षरतेचे प्रमाण ७७.३ टक्के आहे. तर आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण ३६.७७ टक्के आहे. तर स्त्री शिक्षणाचे प्रमाण फारच कमी म्हणजे फक्त २४.०३ टक्के इतके आहे[१७].

**सारणी क्र. १.४ अनुसूचित जमातीचीं एकूण कुटुंबे व दारिद्रयरेषेखालील कुटूंबे (हजारात)**

| अ.नं. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | अनुसूचित जमातीचीं कुटुंबे | | दारिद्रयरेषेखालील कुटूंबाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | एकूण कुटुंबे | दारिद्रय रेषेखालील कुटूंबे | |
| १ | जव्हार | ६९०७८ | ६५९५२ | ९५.५३ |
| २ | शहापूर | ३३६९८ | ३२५५० | ९६.५३ |
| ३ | पेण | ४८२४ | ४५६२ | ९४.५६ |
| ४ | कळवण | ३०५०० | २७५८२ | ९०.४३ |
| ५ | त्र्यंबकेश्वर | ४०१९८ | ३६६१६ | ९१.०८ |
| ६ | तळोदा | ३२६४३ | २९३२२ | ८९,८२ |
| ७ | नंदूरबार | ७२३७१ | ६३७२८ | ८८.०५ |
| ८ | यावल | ३३०२ | ३००५ | ९१.०० |
| ९ | राजूर | ११६७२ | १०८०९ | ९२.६० |
| १० | घोडेगाव | १०१०३ | ९०४२ | ८९.४९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | किनवट | ७०१२ | ६३२२ | ९०.१५ |
| १२ | धारणी | १५३०६ | १३८७३ | ९०.६३ |
| १३ | रामटेक | ५७४५ | ५२६८ | ९१.६९ |
| १४ | देवरी | १४७१३ | १३६३३ | ९२.६५ |
| १५ | पांढरकवडा | २९०७७ | २६४६९ | ९१.०३ |
| १६ | भामरागड | १४९१८ | १४५०८ | ९७.२५ |
| १७ | धनोरा | २१३७७ | १४८८४ | ६९.६२ |
| १८ | राजुर | ५९३७७ | ५६२८ | ९४.५२ |
| १९ | चिमूर | ११४५१ | १०६१४ | ९२.६९ |
| एकूण | | ४३३९४२ | ३८४४०७ | ९०.६९ |

स्त्रोतः आदिवासी उपयोजना अहवाल—२०१०—११

महाराष्ट्रातील आदिवासी सामाजात दारिद्रयाचे प्रमाणही जास्त असल्याचे आढळून येते. आदिवासीचे एकूण व दारिद्रयरेषेखालील कुटुंबे यांची तुलना केल्यास दारिद्रयाचे प्रमाण किती अधिक आहे. याची कल्पना येते. ज्या व्यक्तींना आपल्या जीवननावश्यक गरजाही पूर्ण करण्याइतपत उत्पन्न मिळत नसेल अथवा ज्यांना आपल्या दैनंदिन आहारातून आवश्यक उष्मांक मिळू शकत नाही. अशा कुटुंबाचा समावेश दारिद्रय रेषेखालील कुंटुबात केला जातो. त्यानुसार भामरागड एकात्मीक विकास प्रकल्पातंर्गत भामरागड या ठिकाणाच्या एकूण १४,९१८ कुटूंबांपैकी १४,५०८ कुटूंबे दारिद्रय रेषेखाली आहे. म्हणजेच हे प्रमाण ९७.२५ टक्के इतके अधिक आहे. तर इतर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत दारिद्रय रेषेखालील सर्वाधिक कुंटूबे असणाऱ्या प्रमुख ठिकाणांमध्ये जव्हार (९५,५३) टक्के, शहापूर(९६,२३) टक्के, राजूर (९४,५२) टक्के, पेढ(९४,६६) टक्के, व देवरी(९२,६५) टक्के इत्यादी विभागांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील आदिवासींची भौगोलिकदृष्टया विभागणी वरील सारणी वरुण लक्षात येईल[१६].

**१.११ नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाज :**

नाशिक जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५.५३०० चौ.की.मी आहे. क्षेत्रफळाच्या तुलनेत नाशिक जिल्ह्याचा तिसरा क्रमांक लागतो. २००१ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४९.९३ लाख इतकी होती. त्यात आदिवासी लोकसंख्या ११.९४ लाख इतकी होती. म्हणजेच नाशिक जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण २३.९१ टक्के इतके होते. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत नाशिक जिल्ह्याचा महाराष्ट्र राज्यात चौथा क्रमांक लागतो. एकूण लोकसंख्येशी साक्षरतेचे प्रमाण ७४.१५ टक्के आहे तर आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ५०.७ टक्के आहे. नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील पेठ, सुरगाणा, कळवण, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी व इगतपुरी ह्या तालुक्यामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासी समाज प्रामुख्याने वास्तव्य करुन आहे. नाशिक जिल्ह्यात प्रामुख्याने भिल्ल, कोकणा, कोकणी, महादेव कोळी, ठाकूर, वारली, कातकरी, पारधी, काथोडी, कोळी इत्यादी प्रमुख आदिवासी

जमाती दिसून येतात.ह्या सर्वच आदिवासी जमातींचा प्रमुख व्यवसाय शेती आणि शेतीवर आधारित विविध व्यवसाय दिसून येतात. तर काही आदिवासी समाज दुसऱ्यांच्या शेतीवर मोलमजुरी करतो. नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचे तालुकानिहाय वर्गी करण पुढील सारणी वरुन लक्षात येईल[२०].

**सारणी क्र: १.७ नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचे तालुकानिहाय वर्गीकरण (हजारात)**

| अ.नं. | तालुका | एकूण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | १३१७.३ | १३१.१ |
| २ | सुरगाणा | १४५.१ | १३७.६ |
| ३ | कळवण | १६५.६ | १०९.९ |
| ४ | देवळा | १२९.९ | २१.३ |
| ५ | बागलाण | ३११.३ | १०७.२ |
| ६ | मालेगाव | ७८९.२ | ६५.७ |
| ७ | नांदगाव | २३६.३ | २६.९ |
| ८ | चांदवड | २०५.१ | ३६.९ |
| ९ | दिंडोरी | २६४.७ | १३९ |
| १० | पेठ | ९६.७ | ८९.९ |
| ११ | त्र्यंबकेश्वर | १३६.४ | १०६.३ |
| १२ | इगतपरी | २२८.२ | ८६.३ |
| १३ | सिन्नर | २९२.१ | ३५.४ |
| १४ | निफाड | ४३९.८ | ७९.७ |
| १५ | येवला | २३५.५ | २१.३ |
| एकूण | | ४९९३.७ | ११९४.२ |

भारतीय जनगणना अहवाल २००१

१.१२ **आदिवासी विकासाची व्याप्ती:** आदिवासी विकासाचा एकूण संबंध एका अर्थाने ग्रामीण विभागाच्या विकासाशी आहे. यात आदिवासी लोकांच्या जीवनमानाचा दजो सुधारणे किंवा त्यात गुणात्मक वृध्दी घडवून आणणे हे अभिप्रेत आहे. त्यामुळे या समाजाला विकासाची संधी मिळेल आणि त्यातून त्यांचे जीवनमान उंचावू शकेल. आदिवासी विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक

न्याय, शिक्षण, रोजगार, स्वावलंबन, वित्तीय मदत, ग्रामीण स्वच्छता व आरोग्य, निवारा, पर्यावरण व सुरक्षा यांचा समावेश होतो. आदिवासी विकासाच्या व्याप्तीत पुढील बाबींचा समावेश होतो.[२१]

१) **शेती व संलग्न सेवा व्यवसायांचा विकासः** आदिवासी व ग्रामीण विकास ही व्यापक संकल्पना असून त्यात शेती, शेती संलग्न व्यवसाय, ग्रामोद्योग, वाहतूक व दळणवळण, वने, पर्यावरण, आरोग्य इत्यादींचा समावेश होतो. आदिवासींच्या विकासात या सर्व घटकांचा समावेश होतो.

२) **लोकसहभाग व संघटित प्रयत्नः** आदिवासी व ग्रामीण विकासाची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने शासन, स्वयंसेवी संस्था व आदिवासी समाजाच्या सुधारित प्रयत्नांची गरज आहे. त्याचप्रमाणे केवळ शासनाचे प्रयत्न पुरेशे नसून आदिवासी विकासाच्या कार्यक्रमात लोकसहभाग वाढविण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणेही अपेक्षित आहे.

३) **दारिद्रय निर्मूलनः** आदिवासी समाजात दारिद्रयाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. आदिवासी विकास कार्यक्रमात दारिद्रय निर्मूलन हा मुख्य हेतू असतो. त्यामुळे गरिबातील गरीबाला रेषेच्यावर आणण्यासाठी भर दिला जातो. त्याकरिता किमान अन्न, वस्त्र, निवारा , शिक्षण व आरोग्य या जीवनआवश्यक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जातो.

४) **प्रभावी नेतृत्वः** आदिवासी विकासासाठी आदिवासी जनतेतूनच प्रामाणिक व समर्पित नेतृत्व निर्माण होणे आवश्यक आहे. असे नेतृत्व उदयास येण्यासाठी प्रयत्न केला जातो. कारण जोपर्यत आदिवासी समाज स्वतःहून पुढे येत नाही तोपर्यत त्यांचा विकास साध्य होणार नाही. म्हणून प्रामाणिक दुरदृष्टीचे नेतृत्व निर्माण करणे आदिवासी विकासात अभिप्रेत आहे.

५) **प्रशिक्षण व वैज्ञानिक पध्दतीचा आधारः** शेती व शेतीसंलग्न व्यवसाय , ग्रामोद्योग इत्यादीवर विकास प्रक्रिया अवलंबून असते. या घटकांच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी वैज्ञानिक पध्दतींच्या वापरास उत्तेजन देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाची ओळख करुन देणे, त्यांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे आणि प्रशिक्षणद्वारे ग्रामीण कारागीरांच्या व अन्न व्यावसायिकांच्या कौशल्यात वाढ करणे यात समाविष्ट आहे.

६) **पारंपारिक विचार सरणीत बदलः** आदिवासी समाजात चालीरीती परंपरा यांचा सर्वात जास्त पगडा आहे. त्यामुळे या समाजात नवीन बदलांचा सहजासहजै स्वीकार होत नाही. आदिवासी विकासात ग्रामीण जीवनाची पुनर्रचन तसेच लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात सुधारणा व त्यांच्या पारंपारिक विचारसरणीत विकासाला अनुकूल असे आमुलाग्र परिवर्तन अपेक्षित आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, आदिवासी विकासात शेती, शेतीपूरक उद्योगांचा विकास, शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी असा सामाजिक गरजांचा व सुविधांचा विकास आणि सांस्कृतिक व वैचारिक दृष्टीकोनात बदल घडवून आणणाऱ्या प्रक्रियेचा समावेश होतो. एकंदरित नैसर्गिक परिस्थितीत जमिनधारणा पध्दती, शेतजमिनीचा आकार, जलसिंचन, यांत्रिकीकरण, स्वयंरोजगार, जोडव्यवसाय, सुधारित साधनांचा वापर करणे, शेतमजूर, कारागीर, ग्रामीण उद्योग, पशूपालन,पर्यावरण, जंगले, नैसर्गिक व मानवी साधनांच्या विकासाचा कार्यक्रम इत्यादींचा आदिवासी विकासात समावेश होतो.

१.१३ **आदिवासी विकासाची उदिष्टे :**

सर्वसाधारणपणे आदिवासी विकास साध्य करण्यासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे डोळयासमोर ठेऊन आदिवासी विकास योजना शासन राबविते.

१) **साधनसामग्रीचा कमाल वापर करणे**: आदिवासी भागात नौसर्गिक साधन संपत्ती विपुल प्रमाणात असली तरी तिचा योग्य वापर करण्यासाठी नैसर्गिक व मानवी साधन संपत्तीचा जास्तीत जास्त वापर करणे.

२) **दारिद्रय निर्मुलनः** आदिवासी समाजाचे जीवनमान अत्यंत हलाखीचे असते यासाठी त्यांच्या जीवनमानात सुधारणा करणे. आदिवासी समाजातील दारिद्रयाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन किमान अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या गरजा पूर्ण करण्यासाठी दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाद्वारे विषमता कमी करणे.

३) **लोकसहभाग वाढविणेः** जोपर्यत विकास कार्यक्रमात आदिवासी समाज स्वतःहून सहभागी होत नाही तोपर्यत योजनांची प्रभावी अमंलबजावणी होणे अशक्य आहे. यासाठी निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढवून राजकिय व प्रशासकीय क्षमता विकासाभिमुख बनविणे.

४) **सामाजिक व आर्थिक सेवा पुरविणेः** आदिवासी भागात शासनाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षिणिक सुविधा पुरेशा प्रमाणात पोहचत नाही किंवा त्यांचा लाभ घेतला जात नाही. यासाठी आदिवासी समाजाला सामाजिक व आर्थिक सेवा पुरविणे.

५) **रोजगार पुरविणेः** रोजगाराच्या पुरेशा संधी असतानाही आदिवासी समाज मजुरीसाठी सातत्याने स्थलांतर करत असतो. यासाठी स्थानिक पातळीवरच रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त करुन देणे.

६) **कौशल्य व क्षमतेची जाणीव करुन देणेः** आदिवासी व्यक्ती हा काटक, चपळ व कष्टाळू असतात. या क्षमतेचा योग्य वापर व्हावा या उद्देशाने आदिवासी समाजाला त्यांच्या क्षमतेची, कौशल्याची व जबाबदारीची जाणीव निर्माण करुन देणे.

७) **पोषक वातावरण निर्माण करणेः** आदिवासी भागात निराशावादी वातावरण असल्यामुळे नवीन बदलांचा, विचारांचा अंगीकार केला जात नाही. त्यासाठी विशेष वातावरण निर्माण करुण लोकांची मते, जुन्या सवयी व कृतीत बदल घडवून आणणे.

८) **स्थलांतर थांबविणेः** ग्रामीण भागात रोजगारांच्या पुरेशा संधी उपलब्ध नसल्यामुळे आदिवासी समाज पोटाची खळगी भरण्यासाठी गावोगावी भटकतो त्यामुळे आदिवासी बेरोजगारांचा शहराकडे रोजगार संधीच्या अभिलाषाने जाणारा लोंढा थोपवून आदिवासी भागातच रोजगार उपलब्ध होईल अशी व्यवस्था निर्माण करणे.

९) **स्वावलंबनाला चालना देऊन महिला व युवकांचा सहभाग वाढविणेः** दारिद्रय रेषेखालील कुटुंबाला दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी स्वयंरोजगार उपलब्ध करुन देऊन आदिवासी जनतेला स्वावलंबी बनविणे, आदिवासी विकासात महिलांचा सहभाग फारच कमी असतो. त्यासाठी हा सहभाग वाढविण्यासाठी आदिवासी भागात महीला आणि युवकांच्या सहभागाला पोषक वातावरण तयार करणे.

**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)**

**(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No III Issues V**
**ISSN 2278-5655**

**१.१४ भारतीय राज्यघटनेतील आदिवासीच्या संविधात्मक तरतुदीः**

"आदिवासी समाजाचा मागासलेलापणा लक्षात घेऊन भारतीय राज्यघटनेमध्ये आदिवासींचे हितसंबंध जपण्यासाठी, त्यांना

पुरेसे संरक्षण देण्यासाठी आणि त्यांचे भौतिक जीवनमान उंचावण्यासाठी भारतीय संविधानात विशिष्ट तरतुदी करण्यात आल्या आहेत." भारतीय राज्यघटनेतील १९ (५), ४६, १६४, पाचव्या अनुसूचीसह २४४, २७५ ,३३०. ३४३, ३३५, ३३८,३३८, ३३९, ३४०, ३३६ (२५) या कलमांनुसार काही विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत.

१) धर्म, वंश, जात, लिंगभेद व जन्म ठिकाण यावरुन त्यांच्या विरुध्द पक्षपात केला जाऊ नये अथवा त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जाऊ नये यासाठी प्रतिबंधक अशी कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे. जर पक्षपात अथवा भेदभाव झाला तर असे वर्तन दंडनीय गुन्हा ठरवला जातो.

२) आदिवासींची प्रगती व्हावी या दृष्टीने शासकीय व निमशासकीय खाती, उद्योग, महामंडळे इत्यादी ठिकाणी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव कोटी पध्दतीने भरती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, प्रादेशिक लोकसेवा आयोग व निवळ मंडळामार्फत भरल्या जाणाऱ्या जागांपैकी अनुसूचित जमातीपैकी ७.५ टक्क्यांपर्यत जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी लोकसंख्येनुसार जास्त जागा राखीव आहेत. शैक्षणिक संस्थामधील विविध अभ्यासक्रमासाठी, लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव कोटा पध्दतीने प्रवेश, विनाशुल्क वा अल्पशुल्क घेऊन वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्ती, अर्थसाहाय्य स्वरुपातील मदतीचा हात दिला जातो.

३) संसद, विधीमंडळे, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या इत्यादी लोक प्रतिनिधीक संस्थामध्ये त्यांचे प्रतिनिधीक लोकसंख्येच्या प्रमाणात असावेत. याची हमी देण्याच्या दृष्टीने त्यांच्यासाठी जागा राखून ठेवल्या आहेत. १९७४ च्या अहवालान्वये भारतीय लोकसभेत ४० जागा आदिवासींसाठी राखून ठेवल्या आहेत. त्याचबरोबर विविध राज्यातील विधानसभेत एकूण ३७७१ जागांपैकी ३२१ जागा आदिवासींकरिता सुरक्षित आहेत. महाराष्ट्र विधानसभेत आदिवासी प्रतिनिधींची संख्या १६ आहेत.

४) जंगल व जमिनविषयक हक्क सुरक्षित व संरक्षित राहावेत या दृष्टीने आवश्यक ते कायदे करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारांवर टाकलेली आहे. जमीन हा विषय राज्यसरकारच्या अकात्यारीत येत असल्यामुळे आदिवासींच्या जमीन हस्तांतरास प्रतिबंध करणारे तसेच त्यांच्या हातून गेलेल्या जमिनी परत मिळाव्यात या दृष्टीने योग्य तरतूदी असलेले कायदे राज्य सरकारांनी करावयाचे होते. तसे ते आदिवासी लोकसंख्या असलेल्या सर्व राज्यांनी केले आहेत.

५) आदिवासींच्या परंपरा त्यांच्या वैशिष्टयपूर्ण संस्था व त्यांची संस्कृती यांच्यावर प्राणांतिक आघात केला जाऊ नयेत. किंबहुना त्यांच्यापैकी मूलभूत मानवी हक्क व स्वातंत्र्य, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था यांच्या आड न येणाऱ्या अशा संस्था, परंपरा व सांस्कृतीक वैशिष्टये यांची जपवणूक व संवर्धन करण्याची भूमिका अमगिकारणे या दृष्टीने आदिवासी लोकसंख्या असलेल्या राज्यांनी सल्लागार मंडळाची नेमणूक करणे बंधनकारक केले आहे.

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No III Issues V ISSN 2278-5655

६) राज्यघटनेच्या चौथ्या भागातील १६४ व्या कलमान्वये आदिवासींची अधिक वस्ती असलेल्या भागात आदिवासींच्या कल्याणासाठी व विकासासाठी एक स्वतंत्र्य आदिवासी मंत्री नियुक्त करण्याची तरतूद आहे. [१३]

**१.१५ आदिवासी विकास धोरणः**

"आदिवासीचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १ एप्रिल १९७६ पासून भारतीय राज्य घटनेच्या ४६ व्या कलमान्वये दुर्बल घटकांच्या विकासार्थ आदिवासी उपयोजना सुरु केली आहे. या योजनेत महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यातील एकूण ६८ आदिवासी तालुक्यातील ६९७५ गावांचा समावेश आहे."[१४] बदलता काळ नेहमीच समाजापुढे नवीन प्रश्न व नवीन आव्हाने निर्माण करत असतो. विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर असलेल्या विकसनशील भारतात अशी झळ आदिवासींना बसली ही वस्तुस्थिती आहे. " आदिवासी जीवन पहिले तर तसे खडतर आहे. भयानक दारिद्रयाने त्यांच्या जीवनाला संघर्षाचे रुप आले आहे. आजही काही आदिवासी जमातींना जंगलात मिळेल त्या अन्नावर काही काळ गुजराण करावी लागते" [१५] दारिद्रयाचे वाढते प्रमाण, विविध संसर्गजन्य रोगांची लागण, कुपोषण, निकृष्ट राहणीमान नष्ट होत जाणारे सामाजिक अशा विविध कारणांमुळे आदिवासींच्या समोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. एका बाजुला वैज्ञानिक प्रगतीने आधुनिक समाजाला डोळे दिपवून टाकणारी भौतिक सुबत्ता तर दुसऱ्या बाजुला आदिवासी मात्र दारिद्रयाच्या विळख्यात सापडलेला दिसतो. अशा या समाजाला दारिद्रयाच्या खाईतून बाहेर काढण्यासाठी भारत सरकारने पुढाकार घेतला. शमानता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय या मूल्यव्यवस्थेवर आधारित भारतीय समाजाची पुनर्रचना करण्याचे ध्येय भारत सरकारने बाळगून १९५० साली आदिवासी कल्याण व विकासाचे धोरण निश्चित केले आहे. नियोजनबध्द आर्थिक विकासाचा मार्ग निवडून पंचवार्षिक योजना अम्मलात आणण्यास १९५१ मध्ये प्रारंभ केला. जवळपास ३० वर्षांच्या अनुभवानंतर खऱ्या अर्थाने सरकारने आदिवासी विकासाकडे विशेष लक्ष पुरविण्यासाठी मंत्रालय पातळीवर १९८३ साली आदिवासी विकास विभाग स्थापन करण्यात आले असून आदिवासी विकास महासंचानलयही स्थापन करण्यात आले. तसेच एकात्मिक विकास कार्यक्रमही हाती घेण्यात आला. "आदिवासींना मुख्य प्रवाहात कसे आणावयाचे, त्यांचा विकास कसा करावयाचा, त्यांना विकासाच्या संधी मिळूनही त्यापासून ते वंचित राहतात. त्यांना मिळालेल्या संधीचा उपयोग करता येत नाही त्यावर कोणता मार्ग काढावयाचा याबाबत बऱ्याच चर्चा झाल्या. त्याची परिणती म्हणून महाराष्ट्रात आदिवासी विकास विभाग हा समाजकल्याण विभागापासून वेगळा करण्यात आला. [१६] महाराष्ट्र राज्यातील आदिवासींच्या विकासासाठी तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील आदिवासी विकास योजनांची परिणामकारक शीघ्रगतीने अम्मलबजावणी करण्याच्या उद्देशाने मंत्रालय पातळीवर आदिवासी विकास विभाग निर्माण करण्यात आला. "१९७५–७६ पासून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये गुंतविलेल्या सर्व मार्गांनी मिळणाऱ्या निधीचा विनियोग करण्यासाठी आदिवासी उपयोजना सुरु करण्याची कल्पना साकार होऊ लागली" [१७]

आदिवासी जमाती आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया अत्यंत मागासलेल्या आहेत. त्यांना इतर समाजाच्या स्तरापर्यंत आणण्यासाठी सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून 'आदिवासी उपयोजन' ही संकल्पना स्वीकारली गेली ती आजतागायत राबविली जात आहे. आदिवासी उपयोजनामध्ये विविध कल्याणकारी योजना समाविष्ट करुन त्यासाठी भरीव तरतूद करण्यात

आली. क्षेत्र व परिसर विकासात शिक्षण, तंत्रशिक्षण, स्वास्थ केंद्र, दुग्धविकास केंद्र व त्यांच्या विकासासाठी आवश्यक असलेले आधारभूत विकास कार्यक्रम यांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला. "शतकानुशतके अज्ञान, दारिद्रय, सामाजिक व आर्थिक पिळवणूक यांच्या दुष्टचक्रात सापडलेल्या आदिवासी बांधवांना दिलासा देणारी जी महत्वाची ठोस पावले विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने उचलीत त्यामध्ये १९७२ साली स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळाची गणना केली जाते.[१८] महाराष्ट्र शासनाने आदिवासी समाजाचा जलद विकास घडवून आणण्याच्या हेतूने व विशेष योजना कार्यान्वित करण्यासाठी नाशिक येथे आदिवासी विकास संचलनालय स्थापन करुना ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर असे चार विभाग निर्माण केले आहेत. प्रत्येक विभागाकरिता अप्पर आयुक्त नियुक्त करण्यात आले आहेत. ठाणे विभागांतर्गत १) गोरेगाव २) शहापूर ३) मोखाडा ४) पेण ५)डहाणू ६) घोडेगाव., नाशिक विभागार्तगत १) नाशिक २) कळवण ३) राजूर ४) तळोदा ५) नंदूरबार ६) येवला., अमरावती विभागातर्गत १) अकोला २) धारणी ३) पांढरकवडा ४) किनवट ५) औरंगाबाद., नागपूर विभागातर्गत १) नागपूर २) देवरी ३) चिमूर ४)चंद्रपूर ५)गडचिरोली ६) अहेरी व ७) भामरगड असे एकूण २४ ठिकाणी एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामधील आदिवासी उपयोजना क्षेत्रात विविध प्रशासकीय विभागाच्या स्वतंत्र्य यंत्रणा कार्यरत आहेत. " आदिवासी उपयोजनेसाठी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद केली जाते. आदिवासींच्या विकासासाठी ३५० पेक्षा जास्त योजना शासनाच्या निरनिराळया विभागामार्फत राबविल्या जात असल्याचे दिसून येते. मात्र त्यापैकी किती योजना प्रत्यक्षात अंमलात आणल्या जातात आणि किती कागदावरच आहेत हा संशोधनाचा विषय ठरावा. आदिवासींसाठीच्या योजनाची अत्यंत प्रभावीपणे अम्मलबजावणी करुन त्यांचा लाभ जास्तीत जास्त आदिवासी लोकांपर्यत पोहचविणे गरजेचे आहे."[१९]

**१.१६आदिवासी विकास योजना राबविणारी यंत्रणाः**

आदिवासी विकास कार्यक्रमाची अम्मलबजावणी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या यंत्रणेत काळानुसार व बदलत्या परिस्थितीनुसार बदल करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षात घडलेल्या बदलांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१.१६.१ आदिवासी विकास विभागाची प्रशासकीय यंत्रणाः**

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या ८५.७७ लाख असून ती राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.८५ टक्के आहे. राज्यातील ४२.६ टक्केआदिवासी लोकसंख्या ही राज्यातील १५ जिल्ह्यातील क्षेत्रात विखुरलेली आहेत. आदिवासी समाजातील मागासलेपणा लक्षात घेऊन आदिवासी उपयोजना क्षेत्रात व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आदिवासी विकासाच्या योजनांची शीघ्रगतीने व परिणामकारक , अम्मलबजावणी करण्याच्या उद्देशान`१९८३ साली मंत्रालय पातळीवर ' आदिवासी विकास विभाग' नावाने स्वतंत्र्य विभाग सुरु करण्यात आला. आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी व त्यात सुसूत्रता साधण्यासाठी प्रयत्न केला जातो. "आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्रशासन होण्याच्या दृष्टीने १९९२ मध्ये या विभागाची पुढीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात आली". [२०]

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No III Issues V
ISSN 2278-5655

**आदिवासी विभागाची प्रशासकीय रचनाः**

पुनर्रचनेत आयुक्ताचे पद नव्याने निर्माण करण्यात आले. ठाणे , नाशिक, नागपूर, व अमरावती या ठिकाणी अप्पर आयुक्ताची नवीन विभागीय कार्यालये निर्माण करण्यात आली. नाशिक विभागात – ६, ठाणे विभागात–६, अमरावती विभागात–५, व नागपूर विभागात –७ याप्रमाणे एकूण २४ प्रकल्प कार्यालयांची निर्मीती करण्यात आली. पुनर्रचना केल्यानंतरही प्रकल्पस्तरावर विविध विभागांच्या यंत्रणेत अम्मलबजावणीच्या संदर्भात एकसुत्रता आणण्यात अनेक त्रुटी होत्या. या त्रुटी दूर करुन समन्वय साधण्याच्या हेतूने १९९३ मध्ये संवेदनशील अशा ११ निवडक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रातील प्रशासकीय नियंत्रण बळकट करण्यासाठी अशा प्रकल्पामध्ये भारतीय प्रशासन सेवेतील व भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात निर्णय शासनाने घेतला. या अतिसंवेदनशील क्षेत्रातील प्रकल्प अधिकाऱ्यांना जमीन महसूल संहितेअंतर्गत शासनाने अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून घोषित केले. "आदिवासी उपयोजनेचे नियोजन राज्याच्या एकूण नियोजनाचा भाग होता. नियोजन विभागाद्वारे ते करण्यात येत होते. हे नियोजन अधिक वास्तववादी व्हावे म्हणून १९९३–९४ पासून नियोजन प्रक्रियेत आमुलाग्र परिवर्तन करण्यात आले. नियोजन प्रक्रियेचा आढावा घेऊन त्यात सुधारणा करण्यासाठी द.म. सुकथनकर, माजी मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन आदिवासी विकास विभागाने क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून प्रकल्पाचा आराखडा जिल्हा नियोजन व विकास मंडळाची मान्यता घेतल्यानंतर शासन पातळीवर राज्याचे मंत्री व सचिव, आदिवासी विकास विभाग, जिल्ह्याचे आमदार, खासदार, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प अधिकारी, नियोजन व विकास मंडळाचे निवडक प्रतिनिधी, मंत्रालय विभागाचे प्रशासकिय अधिकारी, यांच्याबरोबर जिल्हावार बैठक घेऊन १९९३–९४ पासून वार्षिक नियोजन व आराखडा तयार करुन त्याला अंतिम स्वरुप देण्याची पध्दत सुरु केली. आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत विकास घडवून आणण्यासाठी व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासी जीवनमान सुधारण्याच्या उद्देशाने स्वतंत्र्य आदिवासी उपयोजना राबविण्यात येतात. त्याकरिता एकूण नियतव्ययाच्या सुमारे ७५ टक्के व्यय हा आदिवासी उपयोजना क्षेत्रात खर्च होतो. त्याप्रमाणे आदिवासी उपयोजना तयार करणे व अंमलबजावणीचे नियंत्रण करण्याची जबाबदारी आदिवासी विकास विभागाकडे आहे."[२१]

**१.१७ संशोधन क्षेत्रातील कामाचे सर्वेक्षण आणि अधिक संशोधनाची गरज**

आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी व आदिवासी विकास योजनांचा लाभ आदिवासींपर्यंत पोहचण्यासाठी कोणकोणत्या अडचणी येतात? व त्या अडचणी कशा प्रकारे सोडविता येतील ? तसेच आदिवासी विकास योजनांचे कोणते बरे– वाईट परिणाम आदिवासींवर होतात. आदिवासी योजने अंतर्गत नाशिक जिल्हयासाठी जो निधी उपलब्ध झाला. त्यामध्ये पीकसंवर्धन, मृदासंधारण, पशुसंवर्धन आणि वने या योजनावरील खर्चाचा वाटा ६३.४७ टक्के इतका होता. चार योजनांवर जसे फलोत्पादन, दुग्धविकास, मत्स्य व्यवसाय विकास व सहकार इत्यादी वरील खर्चाचा वाटा तुलनेने कमी आहे म्हणून हया सर्व योजनाचे अध्ययन गरजेचे आहे. शेतीच्या आधुनिकीकरणाद्वारे देशाच्या आर्थिक विकास करण्याच्या अर्थाताच त्यांच्या अंतर्गत व बाहय

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No III Issues V
ISSN 2278-5655

स्वरूपाच्या समस्यामुळे त्यांचा संख्यात्मक विकास झाला असला तरी त्यांचा दर्जात्मक कार्यामध्ये उणिवा निर्माण झालेल्या आढळतात. त्या कमी करण्यासाठी विविध संदर्भात अभ्यास केलेला आहे. यामध्ये काही अभ्यास हा अधिक तात्विक व तांत्रिक स्वरूपाचा तर काही व्यवहारीक स्वरूपाचा आढळतो. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर सरकारने देशाचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी नियोजनबध्द आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारला. परंतु अध्यापही ग्रामीण भागातील काही समस्या सुटलेल्या नाहीत. बदलत्या परिस्थितीनुसार ग्रामीण भागातील काही समस्याची तीव्रता वाढली असून असून काही समस्या नव्याने निर्माण झाल्या आहेत, जसे गरिबी बेकारी, शेतीला पुरक व्यवसाय, पर्यायी रोजगार अभ्याव, पुरेशा शिक्षणाच्या सोयीचा अभाव अशा अनेक समस्या अद्यापही भेडसावतात. ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी शेती, उदयोग, व सेवा या तीनही क्षेत्रांना पायाभूत सुविधांचा पुरवठा करणे गरजेचा आहे. शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध आदिवासी विकास योजनांची अंमलबजावणी कशा प्रकारे होते तसेच आदिवासी विकासात शासनाच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या हेतूने हा संशोधन विषय निवडला आहे. आदिवासी विकासाकरीता शासन व विविध स्वयंसेवा संस्थाच्यावतीने अनेक विकासाच्या योजना सद्यस्थितीत राबविल्या जातात. आदिवासी समाजातील दारिद्रयेचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी कौटिल्याच्या अर्थशास्त्रापासून ते राज्यघटनेपर्यत विविध तरतुदी केल्याचे आढळून येते. निवडलेल्या आदिवासी संशोधन विषयाच्या अनुषंगाने संदर्भ साहीत्याचा आढावा घेतलेल्या आहे.

रसेल आणि हिरालाल यांनी १९१६ साली 'द ट्राईब्ज ॲण्ड द कास्टस सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ऑफ इंडिया' या शोधग्रंथात महाराष्ट्रातील गोंड, भिल्ल, कोरकू पारधी, परधान इ. जमातीच्या उत्पत्तीविषयी संशोधन केले आहे. त्यांनी केलेल्या अध्ययनातून पुढील निष्कर्ष प्राप्त झाले. जसे महाराष्ट्रातील अदिवासी जमाती या विविध विभागात विखुरलेल्या आहेत. गोंड, भिल्ल, कोरकू या आदिवासींमधील प्रमुख जमाती आहेत आणि प्रत्येक आदिवासी जमातीची संस्कृती, राहणीमान व त्यांच्या कार्यक्षेत्रात मिळाली पाहीजेत अशी महत्वपूर्ण शिफारश केलेली आहे. अशाप्रकारे रसेल व हिरालाल यांनी आदिवासी जमातीच्या उत्पत्तीविषयी विस्ताराने विवेचन केलेले आहे.[२३]

**संशोधनाचे उदिष्टये :**

जिल्हयातील आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

१.जिल्हयातील कृषी विकास व संलग्न सेवा योजनांमुळे आदिवासींच्या रोजगार संधीत वाढ झाली आहे की नाही याचा अभ्यास करणे.

२.जिल्हयातील अदिवासी समाजाच्या कृषी विकास व संलग्न सेवा योजनांचे विकासातील योगदान अभ्यासणे.

३.शासनाने आदिवासींच्या विकासाकरीता आखलेल्या कृषी व संलग्न सेवा विकास योजनांचा अभ्यास करणे.

४.जिल्हयातील कृषी विकास व संलग्न सेवा योजनांचे अदिवासी समाजावरील आर्थिक व सामाजिक परिणाम अभ्यासून त्याचे विश्लेषन करणे व आवश्यक उपाययोजना सुचवणे.

**ब) अभ्यासाची गृहीते**

संशोधकाला संशोधन कार्याला योग्य दिशा मिळण्यासाठी गृहीतकांची गरज असते. गृहीतके म्हणजे संशोधनाच्या फलितासाठी संशोधकाचे अध्ययनपूर्ण अनुमान होय.

१. शासनाच्या कृषी विकास व संलग्न सेवा विकास योजनांमुळे अदिवासींच्या शेती विकासाला मदत झाली आहे.

२. आदिवासी भागात शेती व्यवसायाला पुरक धंद्याचा अभाव आहे.

३. जिल्हयात कृषी विकास व संलग्न सेवा विकास योजनांमुळे अदिवासींच्या रोजगार संधीत वाढ झाली आहे.

४. नाशिक जिल्हयातील कृषी विकास व संलग्न सेवा विकास योजनांमुळे अदिवासींची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणा झाली आहे.

५. नाशिक जिल्हयातील कृषी विकास व संलग्न सेवा विकास योजनांमुळे अदिवासींची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणा झाली आहे.

**क) संशोधन पध्दती आणि संशोधन तंत्रे**

अभ्यास पध्दती मध्ये प्राध्यमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. त्याचप्रमाणे विशलेष व वर्णात्मक पध्दती देखिल वापरलेली आहे.

१) प्रश्नावली व मुलाखत

२) लिखीत साहीत्य

३) नमुन्याद्वारे अध्ययन

अशा प्रकारे दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करुन आवश्यक सामग्री संकलित करण्यात आली.

वरील अभ्यासावरुन असे निदर्शनास आले की, आदिवासी समाजाच्या संशोधनावर आतापर्यत मोठया प्रमाणात अध्ययन झालेले आहे. परंतु झालेल्या अध्ययनात आदिवासी जाती–जमाती, शैक्षणिक, सांस्कृतीक, सामाजिक ,राजकिय ह्या सारख्या अध्ययनावर लोकांनी भर दिल्याचे दिसते परंतु आदिवासी समाज हा ग्रामीण भागात वास्तव्य करतो त्याचबरोबर शेतीव्यवसायावर आपली उपजीवीका चालवतो, ह्या विषयावर मात्र अद्याप ही अध्ययन झालेले आढळून येत नाही. आदिवासी समाज हा आर्थिक दृष्टया मागासलेला आहे. परंतु त्याच्या विकासासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील असून देखिल पाहिजे तेवढे यश अद्याप पदरात मात्र पडलेले नाही आणि त्याचबरोबर शासन आदिवासी समाजासाठी शेती संलग्न विकास योजना राबवत असतांना विकास होतांना दिसत नाही म्हणून प्रस्तूत अध्ययन विषयाची संशोधनासाठी निवड केले आहे.

Copyrights @ **Ms.Yogita M.Bhilore [1] Prof. Dr. Suresh D. Patil[2]**..This is an open access peer reviewed article distributed under the creative common attribution license which permits unrestricted use, distribution and reproduction in any medium, provide the original work is cited.